----------------------------------------------------------------------------------------------------

एका चोराला पोलीस स्टेशनमध्ये आणलेलं असतं.

पोलीस : तू गंपूचे पैसे चोरलेस हे त्याचं म्हणणं तुला मान्य आहे का?

चोर : मी चोरले नाहीत. त्यानंच त्याच्या हातानं मला ते दिले.

पोलीस : कधी?

चोर : मी त्याला बंदूक दाखवली तेव्हा...

----------------------------------------------------------------------------------------------------

मित्र १ : अरे, मी माझं पाकीट घरीच विसरून आलो. मला जरा १००० रुपये दे.

मित्र २ : अरे त्यात काय एवढं ! हे घे २० रुपये. रिक्षाने घरी जा आणि पाकीट घेऊन ये.

----------------------------------------------------------------------------------------------------

परीक्षा जवळ आली होती.
बंडू उन्हात उभा राहून पुस्तक वाचत होता...
.
चंदू : अरे उन्हात का उभा आहेस...??
.
बंडू : बाबा म्हणाले की, घाम गाळल्याशिवाय यश मिळत नाही...!

----------------------------------------------------------------------------------------------------